**ठळक बातम्या**

- १४ खरीप पिकांसाठी किमान आधारभूत दरात वाढ करायला केंद्रीय मंत्रीमंडळाच्या आर्थिक व्यवहारविषयक समितीची मंजुरी

- महाराष्ट्र आणि मध्यप्रदेशातून जाणाऱ्या, रेल्वेच्या दोन मल्टीट्रॅकिंग प्रकल्पांना केंद्रीय मंत्रीमंडळाची मान्यता, शेतकऱ्यांकरता सुधारित व्याज अनुदान योजना चालू ठेवणार

- राज्यातल्या विविध देवस्थानांच्या विकासासाठी सुमारे ३ हजार कोटी रुपयांच्या आराखड्याला मान्यता, शासननिर्णय जारी

- लोकसंख्याशास्त्रातलं संशोधन फक्त अभ्यासक्रमापुरतं मर्यादित राहू नये, अशी उपराष्ट्रपतींची अपेक्षा

**आणि**

- मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे ज्येष्ठ नेते, माजी खासदार लहानु कोम यांचं निधन

**<><><><><><>**

सन २०२५ २०२६ च्या पणन हंगामासाठी १४ खरीप पिकांकरता किमान आधारभूत दरात वाढ करायला केंद्रीय मंत्रीमंडळाच्या आर्थिक व्यवहारविषयक समितीनं मंजुरी दिली आहे. माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी आज नवी दिल्लीत बातमीदारांना ही माहिती दिली. यात सर्वाधिक निव्वळ वाढ कारळासाठी ८२० रुपये प्रतिक्विंटल,

त्याखालोखाल रागीसाठी ५९६ रुपये, कापसासाठी ५८९ रुपये, तर तिळासाठी ५१९ रुपये प्रतिक्विंटल असल्याचं त्यांनी सांगितलं.

महाराष्ट्र आणि मध्यप्रदेशातून जाणाऱ्या भारतीय रेल्वेच्या दोन मल्टीट्रॅकिंग प्रकल्पांनाही मंत्रीमंडळानं मंजुरी दिली. या प्रकल्पांसाठी एकूण ३ हजार ३९९ कोटी रुपये खर्च येणार असून, २०२९-३० पर्यंत ते पूर्ण होतील.

२०२५-२६ साठी शेतकऱ्यांकरता सुधारित व्याज अनुदान योजना चालू ठेवायलाही मंत्रीमंडळानं मंजुरी दिली.

**<><><><><>**

राज्यातल्या विविध देवस्थानांच्या विकासासाठी सुमारे ३ हजार कोटी रुपयांच्या विकास आराखड्याला प्रशासकीय मान्यता मिळाली असून यासंदर्भातले शासननिर्णय नियोजन विभागानं आज जारी केले. यामध्ये तुळजापूर इथल्या तुळजाभवानी मंदिराच्या विकासाकरता १ हजार ८६५ कोटी, मौजे चौंडी इथल्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी स्मृतीस्थळाच्या विकासाकरता ६८१ कोटी, कोल्हापूर मधल्या जोतिबा मंदिराच्या विकासासाठी २५९ कोटी, अष्टविनायक मंदिरांच्या विकासाकरता १४८ कोटी रुपये खर्चाच्या विकासकामांचा समावेश आहे.

या विकास आराखड्यांमुळे या मंदिर आणि परिसराचा विकास होणार असून देवस्थानांना भेट देणाऱ्या भाविकांना, पर्यटकांना पायाभूत सुविधा उपलब्ध होणार आहेत.

**<><><><><>**

राज्यात गेले तीन दिवस झालेल्या मुसळधार पावसामुळे प्रचंड नुकसान झालं असून वेगवेगळ्या घटनांमध्ये बारा जणांचा मृत्यू झाला आहे. यामध्ये पुण्यात तीन, जालन्यात दोन, अहिल्यानगर मध्ये चार तर बुलढाणा, मुंबई, रायगड मध्ये प्रत्येकी एकाचा मृत्यू झाला असून दोन जण जखमी झाले. महाराष्ट्रात गेल्या २४ तासांत काही ठिकाणी पावसाचा जोर कायम आहे.

**बुलढाणा** जिल्ह्यात घारोड परिसरात काल रात्रीपासून ढगफुटी सदृश्य पाऊस पडल्यानं नदीनाल्यांना पूर आला आहे. या पुरामध्ये दोन जण वाहून गेले आहेत. यातल्या एकाला वाचवण्यात यश आलं आहे.

**अकोल्यात** काल सुमारे १३० मिलीमिटर पावसाची नोंद झाली. मुसळधार पावसामुळे रस्ते जलमय झाले होते. त्यामुळे अनेक घरात, पाणी शिरलं. साहित्याचे नुकसान झाले. चार ठिकाणी झाडे उन्मळून पडल्याने वाहनांचे नुकसान झाले. शहरात काही भागांत वीज पुरवठा खंडित झाला. पावसामुळे फळबागा, ज्वारी, कांद्यासह अन्य पिकांचं नुकसान झालं आहे.

**लातूरमध्ये** तीन दिवसांत सरासरी २०६ मिलीमिटर पाऊस पडला.

**नांदेड**मध्ये हदगाव तालुक्यात वरवटी इथं काल ढगफुटी सदृश्य पाऊस झाला. पावसामुळे आलेल्या पुरात ३ जण वाहून गेले.

**धुळे जिल्ह्यात** आज जोरदार पाऊस झाला आहे. पावसामुळे काही सखल भागात पाणी साचले आहे. हवामान विभागाने जिल्ह्यामध्ये पुढील तीन तासांसाठी रेड अलर्ट जारी केला आहे.

**सिंधुदुर्ग** जिल्हयात पावसाचा जोर आज सकाळपासून वाढला आहे. जिल्ह्याला आज रेड अलर्ट जारी करण्यात आला आहे.

दरम्यान, राज्यात काही ठिकाणी मात्र पावसानं विश्रांती घेतली आहे.

**रत्नागिरीत** काल रात्रीपासून पावसाचा जोर कमी झाला आहे. जिल्ह्यात वातावरण ढगाळ आहे आज तिथे आठ दिवसांनी सूर्यदर्शन झालं. लांज्यात गेल्या २४ तासांमध्ये सर्वाधिक ११८ मिलिमीटर पाऊस पडला.

**<><><><><>**

स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या १४२ व्या जयंतीनिमित्त प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, महाराष्ट्राचे राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन, मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज त्यांना आदरांजली वाहिली. भारताच्या स्वातंत्र्य चळवळीतलं सावरकरांचं योगदान तसंच त्यांचं अतुलनीय  धैर्य आणि संघर्ष,  एक कृतज्ञ राष्ट्र म्हणून  आपण कधीही विसरू शकत नाही, असं प्रधानमंत्री मोदी यांनी आपल्या समाजमध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे.

छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या वतीनं स्वातंत्र्यवीर वीर सावरकर यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आलं.

नाशिकमध्येही सावरकर यांच्या जयंतीनिमित्त शहरात मिरवणूक काढण्यात आली. भोसला मिलिटरी स्कुलच्या जवानांनी मिरवणूकीत संचलन करुन स्वातंत्र्यवीर सावरकरांना  सावरकर स्मारकात मानवंदना दिली. रत्नागिरीत, धाराशिव, जालना, इत्यादी विविध ठिकाणी सावरकर जयंती साजरी करण्यात आली.

**<><><><><>**

लोकसंख्या, लोकशाही आणि विविधता हे नव्या भारताचे तीन आधारस्तंभ असून, लोकसंख्येचा अभ्यास करणारे विद्यार्थी या तिन्ही स्तंभांच्या मध्यभागी राहून आकडेवारी आणि धोरणनिर्मिती यातला दुवा

म्हणून महत्त्वाचं काम करतात, असं प्रतिपादन उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी आज केलं. मुंबईत आंतरराष्ट्रीय लोकसंख्या विज्ञान संस्थेच्या ६५ व्या आणि ६६ व्या दीक्षांत समारंभात ते बोलत होते. देशाला शाश्वत विकासाच्या दिशेने घेऊन जाण्यात लोकसंख्याशास्त्र अमूल्य योगदान देतं, यातल्या आकडेवारीच्या आधारे शाश्वत विकास, आर्थिक प्रगती, सामाजिक एकोपा, तसंच देशाच्या सुरक्षेच्या हिताची धोरणं आखता येतात, याकडे उपराष्ट्रपतींनी लक्ष वेधलं. जगात सर्वाधिक लोकसंख्येचा देश असलेल्या भारतात लोकसंख्याशास्त्रातलं संशोधन फक्त अभ्यासक्रमापुरतं मर्यादित राहता कामा नये, असं धनखड म्हणाले.

या क्षेत्रात काम करताना समाजाचं देणं फेडण्याचा प्रयत्न करा, असं आवाहन आरोग्य आणि कुटुंबकल्याण राज्यमंत्री अनुप्रिया पटेल यांनी विद्यार्थ्यांना केलं. पणन आणि राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल उपस्थित होते.

**<><><><><>**

मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे ज्येष्ठ नेते, पालघरचे माजी खासदार लहानु कोम यांचं आज पहाटे अल्पशा आजारानं निधन झालं. ते ८६ वर्षांचे होते. लहानु कोम यांनी १९५९ पासून आपल्या राजकीय कारकिर्दीला सुरुवात केली. आदिवासी, शेतकऱ्यांचं संघटन बांधण्याचं काम त्यांनी अनेक वर्षे केलं. आदिवासी प्रगती मंडळाचं अध्यक्षपदही त्यांनी अनेक वर्षं भूषवलं. कोम यांच्या पार्थिवावर उद्या तलासरी इथं अंत्यसंस्कार होणार आहेत.

**<><><><><>**

इगतपुरी- त्र्यंबक विधानसभा मतदारसंघाच्या शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या माजी आमदार निर्मला रमेश गावित यांनी आज शिवसेनेत प्रवेश केला. यावेळी शिवसेना नेते आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, परिवहन मंत्री प्रतापराव सरनाईक आणि शिवसेनेचे इतर पदाधिकारी उपस्थित होते. गावित यांच्या सह रमेश गावित, नाशिक जिल्हा परिषदेच्या माजी उपाध्यक्ष नयना गावीत तसंच शेकडो पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी शिवसेनेत प्रवेश केला आहे.

**<><><><><>**

माळढोक पक्ष्याच्या प्रजातीतला तणमोर पक्षी रत्नागिरी जिल्ह्यातल्या कातळसड्यावर आढळून आला आहे. हा अतिशय दुर्मिळ पक्षी समजला जातो. तणमोर हा पक्षी रत्नागिरीत पहिल्यांदाच आढळल्याचं पक्षी निरीक्षक सांगतात. याबद्दल अधिक माहिती देत आहेत, आमचे प्रतिनिधी अनिकेत कोनकर....

**होल्ड बाईट कोनकर**

**<><><><><>**

राज्यात येत्या दोन दिवसांत कोकण आणि विदर्भात बऱ्याच ठिकाणी, तर मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात काही ठिकाणी पाऊस पडण्याचा हवामान विभागाचा अंदाज आहे.

**//<><><><><>//**